
# पुण्यश्लोक अहिल्याबाई

गिरिजा कीर



BVBK-0402954

बा.वा. २९५४
३१।३।९४

देणारे हात

# पुण्यश्लोक अहल्याबाई

म. सं. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९५४ दिनांक ३१/३/९४
विषय बा.वा. क्र.........

लेखिका
गिरिजा कीर

BVBK-0402954

मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

*पुण्यश्लोक अहल्याबाई*

प्रकाशिका
सौ. मधुमिता राजीव बर्वे
*मधुराज पब्लिकेशन्स् प्रा.लि.*
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

© सौ. गिरीजा कीर
५ झपूर्झा, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.

प्रकाशन दिनांक
१५ जानेवारी १९९४

प्रकाशन क्रमांक - ६३२
ISBN 81-85773-56-4

मुद्रक
श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ
पुणे ३०.

टाईपसेटिंग
इफेक्टस्
२३ आयडिअल कॉलनी
कोथरुड, पुणे ४११०२९

मुखपृष्ठ
श्री. सुहास चांडक

मूल्य
रुपये चार मात्र

मुलींनो,

तुमच्यातून जेव्हा शेकडो अहल्याबाई जन्माला येतील तेव्हा या देशाचं चित्र पालटेल. देवी अहल्याबाईचं शौर्य, दानशूरपणा आणि निष्ठा डोळ्यांपुढं ठेवा.

गिरिजा कीर

## गिरिजा कीर यांची अन्य पुस्तके

यडबंबू ढब्बू (दु. आ.)
झंप्या दि ग्रेट (दु. आ.)
गमती जमतीच्या गोष्टी (दु. आ.)
खूप खूप गोष्टी (दु. आ.)
इटुकल्या पिटुकल्या गोष्टी (दु. आ.)
शाब्बास पुंडी, शाब्बास!
एका आईचा सलाम व इतर कथा
फुले फुलवणारा म्हातारा व इतर कथा
(चिनी व जपानी कथांचा अनुवाद)

(अन्य ८ पुस्तकांच्या आवृत्त्या संपल्या आहेत.)

पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर, हिचं नाव माहीत नाही असा मनुष्य, भारतवर्षात तरी विरळाच. जिथं जिथं घाट आहेत, अन्नछत्रं आहेत, धर्मशाळा आहेत, मंदिरं आहेत, तिथं तिथं अहल्याबाईच्या पुण्यरूप आत्म्याचं दर्शन आहे. तिनं आपलं सगळं आयुष्य जनहितासाठीच वेचलं. तिच्या मंगलमय, तेजस्वी आणि सात्त्विक जीवनाचं नुसतं वाचन केलं, तरी आपलं मन पवित्र होऊन जाईल. अशा या अहल्याबाईबद्दल आपल्याला कितीशी माहिती आहे? फार कशाला, अहल्याबाईचा जन्म नक्की किती साली झाला याबद्दल, इतिहासकारांतसुद्धा दुमत आहे.

सबंध देशभर, जिच्या पवित्र स्मृतींचा आठव एवढी वर्षं केला जातो, ती अहल्याबाई कशी होती, कशी जगली, सबंध आयुष्यभर आपत्तींच्या वणव्यात ती कशी होरपळून निघाली आणि तरीदेखील स्वत:चं उदात्त जीवन तिनं कसं घडवलं, हा इतिहास मोठा रोमांचकारी आहे.

अहल्याबाईच्या जीवनाचं दर्शन इथं थोडक्यात घडवलं आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात, बाड तालुक्यात, चोंढे नावाचं एक गाव आहे. त्या गावात माणकोजी शिंदे नावाचे एक गृहस्थ राहत होते. ते जातीने धनगर आणि वृत्तीने पाटील होते. १७२५ च्या सुमाराला त्यांना एक मुलगी झाली. तिचं नाव अहल्या. वयाच्या आठव्या वर्षी, मल्हारराव होळकरांचा मुलगा खंडेराव, याच्याशी तिचं लग्न झालं. शिंद्यांच्या घरची मुलगी, सुभेदारांच्या घरी सून

म्हणून आली; आणि तिच्या सगळ्या आयुष्याचेच रंग पालटले. मल्हारराव अतिशय शूर, धाडसी आणि स्वामिभक्त होता. त्याच्या औदार्याबद्दल तर असं सांगतात की, एखाद्या वीराचा पराक्रम जर नजरेत भरला, तर तो हाताखालच्या लोकांना आज्ञा देई, "अरे, बघता काय असे? त्याचे खिसे पैशानं भरा." त्याची पत्नी गौतमाबाई, ही अतिशय धार्मिक वृत्तीची आणि चारित्र्यसंपन्न स्त्री होती. अहल्येपुढं या दोघांचाही आदर्श होता. सासूबरोबर ती पुराणश्रवण, उपास-तापास, व्रत-वैकल्यं आणि यात्रा करी; तर सासऱ्यांबरोबर लढाईची मौज पाह्यला जाई. आपल्या पराक्रमी सासऱ्याचा तिला अतिशय अभिमान होता. ती स्वतःला, 'सुभेदाराची सून' म्हणवून घेण्यात धन्यता मानी.

आपला नवरा फारसा पराक्रमी नाही, उलट व्यसनी आणि दुर्वर्तनी आहे हे लक्षात यायला तिला फारसा वेळ लागला नाही. त्यामुळं देवधर्म आणि सासू-सासऱ्यांची सेवा, यातच ती आपला वेळ घालवू लागली. तिचं पोरपण फार लवकर संपलं. एखाद्या तपस्विनीसारखी ती व्रतस्थ रहायची. आपल्या व्रतस्थ आणि पवित्र पत्नीचा खंडेरावला एवढा वचक वाटायचा, की ज्यावेळी ती त्याला भेटायला येई तेव्हा तो जपून राही. अभक्ष्य-भक्षण करत नसे. 'घुटी'ही घेत नसे.

अशा परिस्थितीत अहल्येला दोन मुलं झाली. पुत्र मालराव किंवा मालेराव आणि कन्या मुक्ताबाई. त्यानंतर ती संसारसुखाबद्दल उदासच राहिली. संसाराची अशी दशा असली, तरी अहल्याबाई ही आदर्श पतिव्रता होती. पतीवर तिची अढळ श्रद्धा होती. याचा अर्थ, नवरा सांगेल त्याप्रमाणं वागायचं; असा मात्र नव्हे. आपल्या कर्तव्यात तसूभरही मागं न राहता, आपल्या नवऱ्यावर तिनं वचक ठेवला होता. आपली सून अतिशय गुणी, चतुर आणि मुत्सद्दी आहे हे सासऱ्यानं ताडलं होतं. त्यामुळं तो बऱ्याचशा

जबाबदाऱ्या तिच्यावर टाके. अहल्याबाई सासऱ्याच्या देखरेखीखाली कामकाज शिकून घेत होती.

१७५४ मध्ये डिगेजवळ कुंभेरीच्या किल्ल्याला मराठ्यांचा वेढा पडला होता. त्यावेळी अहल्याबाई मल्हाररावांना युद्धाच्या कामात मदत करत होती. इकडे खंडेराव मात्र व्यसनात दंग होता. वास्तविक रणांगणावर असताना त्यानं नशेत असायला नको होतं. खंडेरावची स्थिती म्हणजे, मुंग्यांना पंख फुटल्यासारखी झाली होती. बेहोष असतानाच भोजन उरकून तो मोर्चात निशाणापाशी आला आणि गोळी लागून ठार झाला.

मल्हाररावांना हे वर्तमान कळलं, तेव्हा ते बेभान झाले. एकुलत्या एक पुत्राच्या शोकानं वेडेपिसे होऊन तंबूतून उघडे-बोडके धावत सुटले.

इकडे अहल्येच्या सौभाग्यावर तर घालाच पडला. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणं तिनं सहगमन करायचं ठरवलं. अवघं अठ्ठावीस-एकोणतीस वर्षांचं वय! पदरी दोन मूलं! व्यसनी पती लढाईत कामी आलेला! त्यामुळे अहल्येनं सती जाण्याचा निश्चय केला.

सुनेची सहगमनची तयारी पाहून, मल्हारराव अतिशय कष्टी झाला. अहल्येवर त्याचं पुत्रवत् प्रेम होतं. आपला मुलगा नादान आहे हे त्याला माहीत होतं. त्यामुळं वृद्धापकाळी आपल्या संस्थानाची सगळी जबाबदारी तिच्यावर टाकून तो मोकळा होणार होता. अहल्येची सहगमनाची तयारी बघून सुभेदारानं पोटात डोकी घातली आणि तो म्हणाला, "बाई गं, मला उन्हाळा करतेस की काय? तू माझे पाठीवर आहेस, तर अहल्या मेली व खंडू आहे, हा मला भरवसा. आता माझे सौभाग्य कायम ठेवणे तुझ्याच हाती आहे, याचा अवश्य विचार कर व ह्या म्हाताऱ्याची तुला कीव

[illegible] वाचनालय
क्र. २९५७ दिनांक ३१।३।६७
विभाग का। वा।

यंऊ दे.'

मल्हाररावाची ही अवस्था बघून अहल्येनं आपला विचार बदलला. लोक काय म्हणतील, यापेक्षा आपल्यावर जबाबदारी काय आहे, याची तिला जाणीव होती.

लोकांच्या भडिमाराला न घाबरता तिनं फार मोठं नैतिक धैर्य दाखवलं. कदाचित् ती सती गेली असती, तर इतर चार पुण्यवान् स्त्रियांच्यामध्ये तिची गणना झाली असती, इतकंच! पण लोकापवादाला न जुमानता, ती जे सार्वजनिक जीवन जगली, त्याला इतिहासात तोड नाही.

खंडेराव गेला, त्यापाठोपाठ त्याच्या इतर बायकाही गेल्या. एकंदर चौदा जीव गेले. त्यात एक कुत्रीही गेली. कुंभेरीस पंचवीस हजार रुपये खर्च करून मल्हाररावाने खंडेरावच्या नावे एका सुंदर छत्री बांधली आणि उत्तरक्रियेकरता दहा हजार रुपये खर्च केले.

खंडेरावाच्या मृत्यूनंतर तर कारभाराची सगळीच व्यवस्था अहल्याबाईच्या हाती आली. एखाद्या पुरुषाप्रमाणे अहल्याबाई मोठ्या हिमतीनं कारभार पाहत होती. पुत्रवियोगानंतर बारा वर्षांनी मल्हारराव होळकर निधन पावले. अहल्याबाईच्या डोक्यावरचं छत्र उडालं. कर्तेपणानं तीच सर्व कारभार पाहत होती. मुलगा मालेराव याच्याकडे दौलतीचा वारसा आला; पण अहल्या जाणून होती की, आजोबाचं कर्तृत्व नातवात नाही. एकवीस वर्षांचा मालेराव हा वृत्तीनं स्वच्छंदी होता. जनावरं बाळगण्याचा त्याला शौक होता. त्यानं चित्ते, वाघ पाळले होते. हत्तीची साठमारी बघण्यात त्याला मोठी मौज वाटे. संस्थानचा कारभार पाहण्याऐवजी तो विलासात, चैनीत दिवस घालवी. वारंवार समज देऊनदेखील त्याच्या वृत्तीत बदल होत नव्हता. २० मे १७६६ रोजी मल्हाररावांचा अंत झाला आणि जून महिन्याच्या तीन तारखेला पेशव्यांनी मालराव ऊर्फ मालेरावला

सरदारकीची वस्त्रं पाठवली. म्हणजे मल्हारराव गेल्यावर अवघ्या १५ दिवसांतच.

तारुण्य, संपत्ती, सत्ता आणि अविवेक या चारही गोष्टी एकवटल्यावर पुढे काय होईल, हे सांगण्याची आवश्यकताच नाही. हळूहळू मालेरावाचा मनमानी कारभार चालू झाला.

त्यावेळी, यशवंत उर्फ गंगोबातात्या चंद्रचूड, हा मातब्बर दिवाण सुभेदारांच्या पदरी होता. अशा माणसाची मर्जी सांभाळण्याऐवजी, एका क्षुल्लक कारणावरून मालेरावानं त्याला छड्या मारवल्या. कुणाला कामगिरीशिवाय बक्षीस, तर कुणाला अपराधावाचून शिक्षा, असा त्याचा कारभार होता. अहल्याबाई जेवढी सात्त्विक, धर्मभीरू आणि शांत होती, तितकाच तो व्रात्य आणि तामसी होता. ब्राह्मणांना दान देणं हे तर अहल्याबाईचं नित्यकर्म होतं. याउलट मालेराव त्यांच्या खोड्या काढी. तिनं दिलेल्या दानपात्रात, वस्त्रात किंवा जोड्यात तो विंचू घालून ठेवी आणि ते विंचू ब्राह्मणांना चावले की तो खदखदून हसत सुटे. अहल्याबाई तर दु:खानं म्हणे, ‘‘माझ्या पोटी राक्षस जन्माला आला आहे.’’

मालेरावला हळूहळू वेडाचे झटके येऊ लागले. अहल्याबाई महेश्वरी राहत असे. तिथे जरतारी काम करणारा एक गृहस्थ होता. त्याचा आणि वाड्यात काम करणारा एका दासीचा काही संबंध आहे, अशी त्याला शंका यायला लागली. त्यावेळी त्या गृहस्थाची चौकशी चालूच होती. तेव्हा मालेरावने संधी साधून, वेडाच्या भरात त्या माणसाचा खून केला. त्यानंतर चौकशीत तो मनुष्य निरपराध ठरला. ते ऐकून मालेरावला पश्चात्ताप होऊ लागला. या सर्व प्रकाराचा त्याच्या अशक्त मेंदूवर एवढा परिणाम झाला, की त्याच्याशी झालेल्या झटापटीतली वाक्यं तो बडबडू लागला. वेडाच्या लहरीत, ‘मी तुझा भयंकर सूड उगवीन -’

असं तो बडबडे. अहल्याबाई या सर्व प्रकारानं अतिशय दुःखी झाली. रात्र-रात्र मुलाच्या बिछान्यापाशी जागून काढू लागली. परमेश्वराचा धावा करू लागली. मुलाला झपाटणाऱ्या समंधाला उद्देशून सांगू लागली, "तू माझ्या मुलाचा पिच्छा सोड. मी तुझ्यासाठी देऊळ बांधते. मी तुझ्या कुटुंबास काही जमीन करून देते." परंतु कशाचाच काही उपयोग झाला नाही. २७ मार्च १७६७ मध्ये इंदूर मुक्कामी मालेराव मरण पावला. आपल्या एकुलत्या एका मुलाच्या निधनानं अहल्याबाईला ब्रह्मांड आठवलं.

हे सर्व कमी होतं म्हणून की काय, तिच्यावर मुलाला मारल्याचं किटाळ आलं. पण ती इतकी उदात्त, थोर, दयामय आणि पापभीरू होती की, अशी गोष्ट तिच्या हातून कदापि घडणं शक्य नव्हतं. मालेरावाचा मृत्यू ही दुर्दैवाची गोष्ट तर खरीच; पण त्यामुळं अहल्याबाई जनतेच्या पुढं आली. तिचे अलौकिक गुण लोकांच्या लक्षात यावेत म्हणूनच की काय, दैवानं ही योजना केली असावी. तिचा एक पुत्र गेला; पण आता सगळ्या प्रजेचीच ती माता झाली.

मालेरावाच्या मृत्यूनंतर गादीवर कोण बसणार हा प्रश्न सर्वांपुढे उभा राहिला. अहल्याबाईला मुक्ताबाई नावाची मुलगी होती; पण आपल्या धर्मशास्त्राप्रमाणं तिला गादीवर बसण्याचा हक्क नव्हता. अहल्याबाईनं काय विचार ठरवला आहे, याचाही कुणाला अंदाज येईना. कारभारी गंगाधर यशवंत यांनी जवळजवळ ४० वर्षे होळकरांची इमाने-इतबारे सेवा केली होती; पण या वेळी त्याच्या मनात कली उभा राहिला. त्याला वाटलं, देवधर्म करणाऱ्या या बाईला राज्यकारभार कसा झेपेल? शिवाय मालेरावने एकदा वेडाच्या भरात त्याचा अपमानही केला होता. त्यामुळे त्याच्या मनातला सूड जागा झाला; आणि आपणच राज्यकारभार पहावा अशी इच्छा झाली. गंगोबातात्याच्या मनात हा विचार आला खरा;

पण तो पार कसा पाडायचा ? अशा वेळी त्याला घरभेदी दादासाहेबांची आठवण झाली. प्रथम त्यानं बाईला सल्ला दिला, "आपण बाईमाणूस. लोक आपला अंमल मानणार नाहीत. बाईच्या कारभाराला प्रतिष्ठा नाही. तेव्हा आपण दत्तक घ्या, नि कारभार मजवर सोपवा." बाईनं गंगोबाचा सल्ला धुडकावून लावला आणि त्याला खडसावून उत्तर दिलं, "माझी मी समर्थ आहे. तुम्ही किंवा अन्य कोणी लुडबूड करू नये."

हा जबाब मिळाल्यावर गंगोबातात्यानं राघोबादादाशी संधान बांधलं. राघोबा त्या वेळी गोहादच्या स्वारीतील अपयशामुळे निराश व कर्जबाजारी झाले होते. त्यातच त्यांना मालेरावच्या मृत्यूची बातमी मिळाली. त्यांची तृष्णा अजून शांत झाली नव्हती. त्याच्या तोंडास या आमंत्रणाने पाणी सुटले आणि तात्या आणि दादा यांनी संधान बांधले. थोडक्यात राघोबाने इंदोरवर स्वारी करून होळकरांची दौलत लुटावी व दत्तकाकडे कारभार सोपवावा, मग स्वत:कडे दिवाणगिरी यावी, म्हणजे मनसोक्त लूट करता येईल, असा गंगोबातात्यांचा कावा होता.

आता अहल्याबाईची खरी कसोटी होती. नवरा गेला, सासरा गेला आणि एकुलता एक मुलगाही मरण पावला. शोक बाजूला ठेवून, धैर्य एकवटून, बाई कारभार पाहणार तर घरभेद्यांनी हे संकट उभं केलं. या कारस्थानाचा सुगावा आधी शिवाजी गोपाळ आणि राजाराम रणसोड निसवत वगैरे कारभाऱ्यांना लागला. पण ही हकीगत बाईसाहेबांना सांगावी एवढं कुणाचं पुण्य नव्हतं. म्हणून ही मंडळी, हरकूबाई आणि उदाबाई यांच्याकडे गेली. या दोघी बायांची अहल्येवर माया होती. होळकरशाहीचा अभिमान त्यांच्या नसानसांतून ओसंडत होता. म्हणून ही मंडळी या उभयतांस म्हणाली, "बाईसाहेबांशी बोलोन या गोष्टीचा धरबंध आजपासून केला असता सोईस पडेल. नाहीतर तुम्हास पुढे घोड्याचे दाणे

भरडावे लागतील आणि आम्हांस भीक मागावी लागेल. बाईंनी शोकाचे गाठोडे बांधून एकीकडे ठेवून हिंमत धरावी. सरंजामी, इतलाखी यांसी जासूद पाठवून जमा करावे. भोसले, गायकवाड, दाभाडे, शिंदे यांजकडे सांडणीस्वार पाठवावेत. आज आम्हावरी, उद्या तुम्हावरी हीच गोष्ट आहे याचा विचार करून फौज पाठवावी, असा निरोप पाठवावा. तुकोजीबाबास पाचारण करावे.'' या निरोपासरशी हरकूबाई आणि उदाबाई अहल्याबाईकडे गेल्या आणि म्हणाल्या, ''ब्राह्मण (म्हणजे राघोबा) हरामखोरीस आला आहे. वेळीच सावध होऊन प्रसंगाप्रमाणे वागल्यास ठीक; नाहीतर पुढे तुम्हा-आम्हांस दाणे भरडावे लागतील.'' अहल्याबाईनं शांत चित्तानं दोघां कारभाऱ्यांना बोलावणं पाठवलं आणि धनीपणाच्या जरबेनं सांगितलं - ''मेल्या ब्राह्मणाने हरामखोरी आरंभिली आहे. परंतु मी बायको मनुष्य, मी काय करणार हे मनात आणू नका! मी खांद्यावर बासंडा टाकून उभी राहिले म्हणजे मग श्रीमंतांचे दौलतीस अवघड पडेल. ही दौलत आमच्या वडिलांनी, भाडभवई करून मिळविली नाही; तर तलवारीचे अनुमाने शरीर खर्च घातले आहे. आम्ही सिलेदार! वडिलांचे चाकरीप्रमाणे चाकरी घेतल्यास हजर आहोत; पण तुमची-आमची धुणीपाणी संपली असल्यास मोगलांची चाकरी करू, अथवा फिरंग्यांची चाकरी करू, अगर पाहिजे ते करू. पण ब्राह्मण म्हणतील, 'दौलतीचा अभिलाष धरू,' तर ते कालयत्री घडणार नाही.'' असे प्रकट बोलणे करून हळूच कानगोष्ट केली की, भोसले, गायकवाड, दाभाडे वगैरे मंडळींना गुप्तपणे लिहून, सांडणीस्वार पाठवून द्यावेत. तुकोजी होळकरांना ताबडतोब भेटण्यास सांगावे. पण या दोन्ही कामांचा मंत्रभेद न होण्याविषयी ताकीद दिली.

सरदार मंडळींना पत्रं गेली. उदयपूरला असलेल्या तुकोजी होळकरांना पत्र गेले की, ''फौज जेथील तेथे मुस्तकीम ठेवून,

तुम्ही जेवीत असल्यास पाणी प्यावयास येथे आम्हापाशी यावे.''

इकडे गंगोबा मनातले मांडे खात होते. अहल्याबाईला दोन समजुतीच्या गोष्टी सांगून, राज्यकारभार आपल्या हाती घ्यावा. तिनं ऐकलंच नाही तर शेवटी रघुनाथरावांचं सहाय्य घ्यावं. पण गंगोबाची कल्पना साफ चुकीची ठरली. अहल्याबाई अतिशय धीराची आणि मानी स्त्री होती. ती त्याला फटकून म्हणाली, ''आमच्या या गृहकृत्यात राघोबा झाला म्हणून काय झाले! त्यास हात लावण्याचा काय अधिकार? माझा मालेरावबाबा गेला, तेव्हाच सुभेदारांचा वंश बुडाला. आता त्यांच्यामागे ज्या दोन पुरुषांचा हक्क होता, त्यांपैकी मी एकाची आई आहे. त्यामुळे होळकरांच्या गादीवर बसणारा मुलगा पसंत करणे, न करणे याचा मलाच अधिकार आहे व मजवर कसलेही संकट आले, तरी हा माझा वाजवी अधिकार बजावण्यास मी कालत्रयी किंचितही माघार घेणार नाही.''

हा खरमरीत जबाब ऐकूनदेखील गंगाधर तात्या बेफिकीर राहिले. ही बाईमाणूस, हिला कोण मदत करणार? असा त्यांचा विश्वास. दादासाहेबांच्या मदतीने त्यांनी लढाईची जय्यत तयारी सुरू केली. बाई पडली महामुत्सद्दी. तिनं मोठ्या चातुर्यानं राघोबादादांना निरोप पाठवला.

''आपण स्त्रीबरोबर युद्ध करू नका. नाहीतर तुमच्या नावास जो कलंक लागेल तो कशानेही कालत्रयी निघणार नाही. मी तर बोलून-चालून स्त्रीच! माझा जर युद्धात पराभव झाला, तर मला कोणीही नावे ठेवणार नाहीच. पण जर यदाकदाचित युद्धात तुमचा पराभव झाला, तर सर्व जगात तुमचे हसे मात्र होईल. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. कारण ते तुम्हांसच हितावह आहे. आमचे त्यात काही एक नुकसान नाही.''

अहल्याबाईनं असा निरोप पाठवला तरी इकडे तिनं लढाईची तयारी चालवली होतीच. असं सांगतात की, युद्धप्रसंगी तिनं दोनशे स्त्री घोडेस्वार पुढे आणले. स्त्रियांची फौज पाहून राघोबादादा बुचकळ्यात पडले. दादासाहेबांच्याबरोबर त्या वेळी महादजी शिंदे होता. त्यानं दादासाहेबांना स्पष्ट शब्दात सांगितलं, की अशा वेळी मी आपणास मुळीच सहाय्य करणार नाही. मागे महादजीला मल्हाररावानं सहाय्य केलं होतं ते स्मरून त्यानं मल्हारजीच्या सुनेची बाजू घेतली.

इकडे अहल्याबाईनं श्रीमंतांना पत्र टाकून कळवलं की, दौलत आणि सरदारी माझ्या हाती रहावी. माधवराव पेशव्यांचं आणि होळकरांचं प्रथमपासूनच चांगलं होतं. आता तर अहल्याबाईचं पत्र गेलं होतं. त्यामुळं पेशव्यांनी उघडउघड तिची बाजू उचलली.

इकडे सर्व सरदारांनीही मल्हारजीचे उपकार स्मरून अहल्याबाईचीच बाजू घेतली. तुकोजी होळकरानं दादासाहेबांकडे सांडणीस्वार पाठविला. "क्षिप्रा उतरला असता तुमची-आमची तरवार चालेल. याचा विचार करून मग पाऊल टाकणे." आता दादासाहेब विचारात पडले आणि उलटा निरोप पाठविला की, "मालरावबाबा वारले यास्तव आम्ही आपल्याकडे मातंगपोशीस येत असता, तुमचे बुद्धीस विपर्यास येऊन, तुम्हीच आम्हाला वेडावाकडा निरोप पाठविता, याला काय म्हणावे?"

हा निरोप ऐकल्यावर तुकोजीनं त्यांना कळवलं की, "फौज बाजूला ठेवून पालखीत बसून एकटे यावे." मग राघोबादादा पालखीत बसले आणि दहा-पाच सरदार शागीर्द सोबतीला घेतले. मग तुकोजी होळकरानं सामोरे जाऊन त्यांच्या पायावर डोकं ठेवलं. मग तसेच ते इंदूरला बाईंना भेटायला गेले. अहल्याबाईच्या राजकारभारातील शहाणपणापुढे आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वापुढे

दादासाहेबांचं काहीच चाललं नाही. मग सामोपचारानं सर्व बोलणी झाली.

अहल्याबाईनं स्वतःच्या अक्कलहुशारीनं गंगोबातात्या चंद्रचूडांचं कारस्थान अशा रीतीनं मोठ्या हिमतीनं हाणून पाडलं.

या सर्व धामधुमीतही अहल्याबाईचं लक्ष नातवावर होतंच. मुक्ताबाईचा मुलगा 'नथ्याबा' याच्यावर तिची विलक्षण माया होती. होळकरांच्या गादीचा वारस म्हणून ती नथ्याबाकडे पहायची. त्याला फार जपायची. त्याच्यावर उत्तम संस्कार करायची. तिनं त्याला आपल्याजवळ महेश्वरला ठेवलं होतं. तो तेरा वर्षांचा झाला, आणि अहल्याबाईनं त्याचं मोठ्या थाटात लग्न करून दिलं. पहिल्या लग्नानंतर, थोड्याच दिवसांनी, अहल्याबाईनं त्याचं दुसरंही लग्न करून दिलं. पण ऐन तारुण्यात कुठलाच सुखोपभोग घेण्याचं त्याच्या नशिबी नव्हतं. राज्यपदाऐवजी राजयक्ष्मा त्याच्यामागे लागला आणि वयाच्या अवघ्या तेविसाव्या वर्षी त्याला देवाज्ञा झाली. त्याची पहिली पत्नी अठरा वर्षांची, तर दुसरी दहा वर्षांची होती. दोघींनी सर्व अलंकार घालून, अंबारीत बसून पतीबरोबर सहगमन केलं. अहल्याबाई चालत स्मशानापर्यंत गेली. रात्री परतली तेव्हा ती दुःखार्णवात बुडून गेली होती. जणू काही तिचा निर्वंशच झालेला ती पाहत होती. नातवाच्या मृत्यूनंतर लेकीच्या आधारावर अहल्याबाई दिवस काढत होती. दानधर्मामध्ये आणि धर्मकृत्यांमध्ये बराचसा काळ वेचत होती. तरीदेखील या पवित्र स्त्रीच्या नशिबात कणभरही सुख नसावं.

आणि एका वर्षभरातच तिचे जावई, यशवंतराव फणसे कॉलऱ्यानं मृत्युमुखी पडले. मुलगी मुक्ताबाई अपरंपार दुःखी झाली. पण ती अहल्याबाईची मुलगी होती. मुळूमुळू रडत बसणं तिच्या वृत्तीतच नव्हतं. तिनं सहगमनाची तयारी सुरू केली आणि अहल्याबाईला आभाळ फाटल्यागत झालं. तिनं मुलीला खूप समजावलं. राणी

आणि आई या दोन्ही नात्यानं तिला दटावलं. सगळे उपाय हरले तेव्हा लेकीला साष्टांग नमस्कार घालत, ती पुण्यशील वृद्धा काकुळतीनं म्हणाली, "मुली, परमेश्वराच्या ठायी तुझी जर खरोखरी भक्ती असली तर मला, या तुझ्या आईला, म्हातारपणी या संसारात एकटी व निराश्रित अशी सोडू नकोस." पण मुक्ताबाई निर्धारानं म्हणाली, "आई, आता तुझे म्हातारपण झाले. हे तुझे पुण्यमय आयुष्य आणखी थोड्याच दिवसांनी संपणार आहे. माझे एकुलते एक बाळ गेले, पती गेले. तूही मला सोडून गेलीस म्हणजे मी कुणाकडे पाहू? आता कशी सोन्यासारखी संधी आली आहे. ही जर मी दवडली तर मग मला पुन्हा आजच्यासारखे उजळ्या तोंडाने जाता येणार नाही."

स्मशानात अहल्याबाई मुलीजवळ उभी होती; पण नंतर पेटलेल्या चितेत तिला पाहून अहल्याबाईला मूर्च्छा आली. स्वत:च्या पोटच्या गोळ्याला होमात पडताना बघून, त्या सहृदय आईला काय वाटलं असेल याची कल्पनाच केलेली बरी.

देवी अहल्याबाईवर लहानपणापासून इतके भयंकर आघात झाले की, तिच्याऐवजी दुसरी कोणी असती तर त्या दु:खाग्नीत होरपळून निघाली असती. परंतु अतिशय खंबीर मनानं, आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत तिनं प्रजेलाच पुत्रवत् मानून, अपार सुख दिलं, दानधर्म केले, मंदिरं बांधली. आयुष्यभर ती इतरांसाठी जगली. एखाद्या अचल दीपस्तंभाप्रमाणं जगलेल्या या स्त्रीचं जीवन, गंगाजळासारखं निर्मळ होतं. त्या पवित्र आत्म्याच्या स्मृतीला आपण नम्र अभिवादन करू या!

***

BVBK-0402954

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
अ. क्र. २९५८ दिनांक 3/3/08
विषय ९१·९१ क्र. ........